190 Loans to public sectors and other undertakings.	..	–	–	–	–	१९०	सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका.
(01) (01) Maharashtra Railway Infrastructure Development Company - Plan (50020014).	..	–	–	–	–		(०१) (०१) महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी योज- ांत ित (५००२००१४).
32, Contributions	..	525000	2000000	2000000	2000000		३२, अंशदाने योजनांतर्गत
Total	..	525000	2000000	2000000	2000000		एकूण

कार्यक्रम ९

गृह विभाग (परिवहन)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

प्रस्तावना :--

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची स्थापना मार्ग परिवहन महामंडळ कायदा (RTC ACT) १९५० अन्वये झाली आहे. महामंडळाची कार्यभार चालविण्यासाठी राज्य शासनाकडून संचालक मंडळाची नियुक्ती केली जाते, तसेच दैनंदिन कारभार चालविण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची नियुक्ती राज्य शासनामार्फत केली जाते.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची निर्मिती राज्यातील प्रवासी जनतेस कार्यक्षम व किफायतशीर वाहतूक सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने झालेली आहे.

शासन निर्णय क्रमांक एसटीसी-०८१४/प्र.क्र. ४७८/परि-१, दिनांक ४ जुलै २०१५ व शुद्धिपत्रक दिनांक ८ सप्टेंबर २०१५ शासन निर्णयाद्वारे शासनाने ग्रामीण सेवेवरील प्रवासी कराचा दर १७.५ टक्के इतका ठेवून ७.५ टक्केप्रमाणे प्रवासी कराची रक्कम शासनास अदा करावी व उर्वरित १० टक्के कराची रक्कम शासनाचे भांडवली अंशदान म्हणून महामंडळाने समायोजित करावी, अशी मंजुरी महामंडळाला दिलेली आहे.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये लेखाशीर्ष-५०५५ मार्ग परिवहन यासाठी रुपये ५३१००.०० लाख एवढी तरतूद केली आहे. सन २०२०-२१ या लेखाशीर्षाखाली प्रत्यक्ष खर्च रुपये १९३२०.६२ लाख व सन २०१९-२० मधील शिल्लक रक्कम रुपये ३४७७६.२० लाख असा एकूण खर्च रुपये ५४०९६.८२ लाख झाला आहे. सुधारित अर्थसंकल्प सन २०२०-२१ मध्ये रुपये १.०० लाख इतकी तरतूद करण्यात आली. तथापि, त्यामुळे सन २०२०-२१ च्या आर्थिक वर्षात रुपये ०.०० लाख खर्च झाला. परिणामी सन २०२०-२१ मधील रुपये १९३२०.६२ लाख व सन २०१९-२० मधील रुपये ३४७७६.२० लाख रक्कम शिल्लक राहिली. त्यामुळे सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये रुपये ५३१००.०० लाख तरतूद असल्याने रुपये ९९६.८२ लाख तरतूद कमी पडत आहे. त्याचप्रमाणे सन २०२१-२२ मधील भांडवली अंशदानाची रक्कम रुपये २९९०२.३६ लाख इतकी अपेक्षित आहे. त्यामुळे सन २०२१-२२ साठी एकूण खर्च रुपये ८३९९९.१८ लाख (रुपये ५३१००.०० लाख + रुपये ९९६.८२ लाख + रुपये २९९०२.३६ लाख) इतका आहे.

त्याचप्रमाणे चालनातील वाढ व भारमानातील वाढ यामुळे उत्पन्नात होणारी अंदाजित वाढ विचारात घेता सन २०२२-२३ मध्ये प्रवासी कराच्या रकमेत त्या प्रमाणात वाढ होणार असल्याने प्रवासी कराच्या १० टक्केप्रमाणे भांडवली अंशदानासाठी रुपये ५४०७९.६३ लाख एवढी तरतूद करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

गृह विभाग — मागणी क्रमांक बी-१०

४०५५, पोलीस यावरील भांडवली खर्च ४०७०, इतर प्रशासनिक सेवा यावरील भांडवली खर्च, ५००२, भारतीय रेल्वे यावरील खर्च, ५०५५, मार्ग परिवहनावरील भांडवली खर्च

		दत्तमत	*भारित*	एकूण
स्थूल बेरीज	...	--	..	--
वजा-वसुली	...	..	..	..
निव्वळ बेरीज	...	--	..	--

	प्रधानशीर्ष		प्रत्यक्ष रकमा २०२०-२१ Actuals 2020-21	अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२ Budget Estimates 2021-22
1	2		3	4
दत्तमत-	४०५५, पोलिसांवरील भांडवली खर्च.	...	2079446	5786560
दत्तमत-	४०७०, इतर प्रशासनिक सेवावरील भांडवली खर्च.	...	4203730	8620945
दत्तमत-	५००२, भारतीय रेल्वे यावरील भांडवली खर्च (व्यावसायिक मार्ग).	...	525000	2000000
दत्तमत-	५०५५, मार्ग परिवहनावरील भांडवली खर्च.	...	–	5310000
दत्तमत-	एकूण	...	6808176	21717505
	एकूण बेरीज	**...**	6808176	21717505

Home Department–Demand No. B-10
4055, Capital Outlay On Police, 4070, Capital Outlay On Other Administrative Services
5002, Capital Outlay On Indian Railways, 5055, Capital Outlay On Road Transport

Voted	*Charged*	Total		
–	..	–	...	Gross Total
..	..	..	...	Deduct Recoveries
–	..	–	...	Net Total

(रुपये हजारांत / *Rs. in thousands*)

सुधारित अंदाज २०२१-२२ Revised Estimates 2021-22 5	अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३ Budget Estimates 2022-23 6	Majorheads 2
6286560	7470323	**Voted -** 4055, Capital Outlay on Police
9076998	10930700	**Voted-** 4070, Capital Outlay on other Administrative Services.
2000000	2000000	**Voted-** 5002, Capital Outlay on Indian Railways (Commercial Line).
5310000	5310000	**Voted-** 5055, Capital Outlay on Road Transport.
22673558	**25711023**	**Total–Voted**
22673558	**25711023**	**Grand Total**

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

गृह विभाग (बंदरे व परिवहन)

प्रस्तावना

महाराष्ट्राला ७२० कि. मी. लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. त्यापैकी अंदाजे बृहन्मुंबई ११४ कि. मी., पालघर जिल्ह्यामध्ये ११० कि.मी., ठाणे १७ कि. मी., रायगड जिल्ह्यामध्ये १२२ कि. मी., रत्नागिरी जिल्ह्यामध्ये २३७ कि. मी. आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये १२० कि. मी. अशी ही किनारपट्टी पसरलेली आहे. या किनारपट्टीशी संलग्न ४८ लहान बंदर हद्दी आहेत. ह्या किनारपट्टीच्या जवळून वाहणाऱ्या नद्या व खाड्या या किनारपट्टीला येऊन मिळतात. हा प्रदेशही अत्यंत दुर्गम व अवघड आहे. वाहतुकीसाठी दुर्गम भूप्रदेश असलेल्या भागातील वाहतुकीची गरज ही किनारपट्टी पूर्ण करते. सन १९६० सालापर्यंत वेगळी अशी बंदर संघटना नव्हती. तोपर्यंत बंदराचा कारभार राज्य शासनाने भारत सरकारच्या अबकारी खात्याकडे एजन्सी पद्धतीने सोपविला होता. नंतर बंदर विकासासाठी जनतेच्या वाढत्या मागण्यांचा विचार करता राज्य सरकारने बंदर विभागाला वेगळा करण्याचा निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे बंदर विभागासाठी दिनांक १ एप्रिल १९६३ मध्ये वेगळे कार्यालय स्थापन करून तत्कालीन इमारती व दळणवळण खात्याच्या अधिपत्याखाली, मुख्य बंदर अधिकारी यांच्या अधिपत्याखाली त्याचा कारभार दिला. बंदर संघटनेची स्थापना ही बंदर विकासाच्या दृष्टीने त्यात अधिक सुधारणा, बंदराचा विकास करून जहाजे वाहतुकीची गरज पूर्ण करण्यासाठी दळणवळणाबाबत परवाना देणे व संरक्षण करणे, आकारणी, वसुली इत्यादी तसेच नौकानयनविषयक कायदे व नियमांच्या वेगवेगळ्या तरतुदींची अंमलबजावणी इत्यादी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केली.

शासनाने दिनांक ३१ ऑगस्ट १९९० च्या आदेशानुसार दिनांक ३० जून १९९० पासून बंदर विभागामध्ये विभागप्रमुख म्हणून जल परिवहन आयुक्त असे भारतीय प्रशासकीय सेवेतील पद निर्माण केले होते, त्यांच्या अधिपत्याखाली बंदर संघटनेच्या कार्यात एक सुसूत्रता आणण्यासाठी (१) मुख्य बंदर अधिकारी, (२) जल आलेखक आणि (३) सागरी अभियंता या कार्यालय प्रमुखांचा समावेश करण्यात आला होता. ४८ लहान बंदर हद्दीची खालील ५ बंदर समूहांमध्ये विभागणी करण्यात आली आहे व त्याचे प्रादेशिक बंदर अधिकारी हे कार्यालय प्रमुख असून मुख्य बंदर अधिकारी यांचे अधिपत्याखाली काम करतात.

(१) बांद्रे बंदर समूह
(२) मोरा बंदर समूह
(३) राजपुरी बंदर समूह
(४) रत्नागिरी बंदर समूह
(५) वेंगुर्ले बंदर समूह

राज्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने लहान बंदरांच्या विकासासाठी शिखर संस्था म्हणून महाराष्ट्र सागरी मंडळाची स्थापना केली आहे. मंडळाकडे नियामक प्राधिकारांबरोबर खाजगी क्षेत्रास सहभागी करून बंदराचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड अध्यादेश, १९९६, दिनांक ४ ऑक्टोबर १९९६ रोजी घोषित करण्यात आला व शासन निर्णय क्रमांक ईपीटी-१०९६/प्र. क्र. १३३/परि--५, दिनांक २२ नोव्हेंबर १९९६ नुसार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, दिनांक २२ नोव्हेंबर १९९६ पासून कार्यान्वित झाले आहे. सदर बोर्डाचे अध्यक्ष, मा. मंत्री (बंदरे) असून बोर्डाला व्यावसायिकता येण्यासाठी जलवाहतूक/बंदर काम, व्यवस्थापन, वित्तीय बाबी इत्यादी क्षेत्रातील तज्ज्ञांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अधिपत्याखाली पूर्वीचे जलपरिवहन आयुक्त, मुख्य बंदर अधिकारी, सागरी अभियंता, जल आलेखक व स्थापत्य अभियांत्रिकी कार्यालयांचा समावेश करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून खालील योजना राबविल्या जातील.

१. **बंदराचा विकास.**--नैसर्गिक सोयीचा अंदाज आणि त्यांचा हवामानविषयक दृष्टिकोनातून विचार, गाळ काढणे, बंदरांची आणि धक्क्यांची रचना व बांधकाम क्षमता (Berthing Forces), बंदराकडे जाणारे मार्ग, त्याचे बांधकाम नौकानयनांचे मार्ग आणि रचना, गाळ काढण्याच्या गरजा, नौकानयनविषयक मदत, जहाजे नांगरण्याची सोय, माल साठविण्यासाठी जागा, पाणी व विद्युत पुरवठा, जोड रस्ते, प्रवासी जेट्टीचे बांधकाम, बंदरालगतच्या प्रवासी सुखसोयी बांधकामे, वाहतुकीमध्ये सुधारणा इत्यादींचा यात अंतर्भाव आहे.

२. **सागरी अधिनियम (मेरीटाईम ॲक्ट) व त्याखालील नियमांची अंमलबजावणी.**--बंदराचे व्यवस्थापन, देखभाल भाड्याची आकारणी, जहाजांचे परवाने इत्यादींची तरतूद या अधिनियमात केली आहे. कर, भाडे आणि इतर वसुलीसारख्या स्वरूपाच्या शुल्कासाठीदेखील या अधिनियमात तरतूद केलेली आहे.

३. **अंतर्गत जलवाहतूक विकास.**--सदर योजना संचालक, अंतर्गत जलवाहतूक, मुंबई यांचे नियंत्रणाखाली होती. परंतु शासनाने सदरचे पद शासन गृह विभाग क्रमांक ईपीटी-१०८७/सीआर-९४३/परिवहन-५, दिनांक ७ डिसेंबर १९८७ अन्वये दिनांक १० सप्टेंबर १९८७ पासून कमी करण्यात येऊन हा विभाग मुख्य बंदर अधिकारी, यांच्या नियंत्रणाखाली आणण्यात आला आहे.

४. लाँच सेवा.--किनाऱ्यावरील खाड्या व नद्यांच्या अंतर्गत जलवाहतुकीच्या मार्गाचा विकास त्यावरील प्रवासी सेवा व लाँचवरील नियंत्रण ही अंतर्गत जलवाहतुकीची कार्ये आहेत.

५. जल आलेखन सर्वेक्षण खात्याची स्थापना प्रामुख्याने महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर तसेच कोकण विभागातील नदी/खाडींमध्ये जल आलेखन सर्वेक्षण व इतर सागरी संशोधन करण्यासाठी लागणारी माहिती जमा करण्यासाठी करण्यात आली आहे. जल आलेखन सर्वेक्षण खात्यामध्ये सर्वेक्षण पथके निर्माण करून प्रत्येक पथकासोबत वाहन, स्वतंत्र जल सर्वेक्षण नौका व आधुनिक सर्वेक्षण उपकरणे तसेच इतर साहित्यासहितही पथके जल सर्वेक्षणाची काम करीत आहेत.

जल आलेखन सर्वेक्षणाचा वार्षिक कार्यक्रम जल आलेखन कार्यालयाकडून तयार करण्यात येतो. त्यामध्ये प्रामुख्याने शासकीय/निमशासकीय विभागांची मागणी तसेच लहान बंदरांची सुधारणा, बंदर प्रकल्प सर्वेक्षण, मत्स्यव्यवसाय प्रकल्प, सार्वजनिक बांधकामासाठी, खारभूमी योजना, अंतर्गत जलवाहतूक इत्यादीसाठी जल सर्वेक्षण कामांचा समावेश करून जल आलेखन सर्वेक्षण कार्यक्रमास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ यांची मान्यता घेण्यात येते.

पावसाळी हंगामामध्ये जल आलेखन सर्वेक्षण उपकरणांची, वाहन व सर्वेक्षण नौकांची देखभाल केली जाते. जल आलेखन सर्वेक्षण विभागाकडून महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम किनारपट्टीत लहान बंदरांची भरती ओहोटी निर्देशिका वर्ष पूर्ण होण्यापूर्वी दरवर्षी तयार केली जाते. या भरती ओहोटी निर्देशिकेमध्ये प्रत्येक बंदराकरिता त्या वर्षातील दर दिवशीच्या भरती ओहोटीच्या पाण्याची पातळी आणि संभाव्य वेळ दर्शविली जाते.

जल आलेखन सर्वेक्षण विभागाकडून महाराष्ट्र सागरी मंडळाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या नदी व खाडीवरून जाणारे रस्ते पूल, रेल्वे पूल, पाईपलाईन वाहून नेणारे पूल, ओव्हरहेड वीजवाहक तारा, तसेच समुद्राच्या तळाखालून जाणाऱ्या तेल व गॅस पाईपलाईन, ऑप्टिकल फायबर केबल इत्यादींकरिता बांधकामे करण्यासाठी विविध सरकारी, खाजगी संस्था/कंपन्या यांना परवानगी देण्यात येते. त्याकरिता नौकानयन जलमार्गाची सध्याची खोली व नौकानयन जलमार्गातील सध्याची व भविष्यातील होणारी जलवाहतूक व मालवाहतूक तसेच सध्या सुरू असलेले व प्रस्तावित असलेले बंदर प्रकल्प इत्यादी गोष्टींचा अभ्यास करून नौकानयन मार्गात पुलाचे बांधकाम करणेकरिता Vertical व Horizontal Clearance देऊन पुढील कामांना परवानगी देण्यात येते.

तसेच महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे वाळू/रेती निर्गती धोरण, दिनांक २१ मे २०१५ नुसार महाराष्ट्र सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून (CRZ) नौकानयन जलमार्ग, जलवाहतुकीस सुकर करण्यासाठी नदी/खाड्यांमध्ये यांत्रिक व हातपाटी पद्धतीने उत्खनन करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग व कोकण विभागातील संबंधित जिल्हाधिकारी यांना दरवर्षी वाळू/रेती उत्खनन करण्यासाठी ना-हरकत दाखला देण्यात येतो. तसेच वाळू/रेती निर्गती धोरणानुसार इतर तांत्रिक माहिती पुरविण्यात येते.

६. सागरी अभियंता चीफ सर्व्हेअर यांच्याकडे पुढीलप्रमाणे कार्य आहेत :--

(१) नौसमूह.--महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे असलेल्या नौकांचे परिरक्षण आणि दुरुस्ती.

(२) गाळ काढणे.--मंजूर झालेल्या कार्यक्रमाप्रमाणे गाळ काढण्यासाठी गाळ उपसणी गटाची योजना करणे, गाळ काढण्याचे काम करणे.

(३) नौकानयनविषयक सहाय्य.--लाईट बोया, वादळसूचक संदेश उपकरणे इत्यादींसारख्या नौकानयनविषयक सहाय्यांचे संपादन करणे, या कामामध्ये संकल्पना रचना, निरीक्षण, कार्यादिष्ट जागेवर उभारणी करणे आणि या सहाय्यांचे परिरक्षण करणे यांचा समावेश आहे.

(४) बोया.--सुरक्षित नौकानयनासाठी आवश्यक तेथे आवश्यक तेवढे बोया ठेवण्यात येतात.

(५) तरते धक्के.--तरत्या धक्क्यांचे संकल्पचित्र तयार करणे. त्यांची बांधणी वाहतूक करणे, योग्य त्या ठिकाणी स्थापना करणे आणि त्यांची देखभाल करणे.

(६) इनलॅन्ड व्हेसल ॲक्ट, १९१७.--या अंतर्गत जहाजांची तपासणी, सर्वेक्षण आणि त्यांचे प्रमाणपत्र देणे, जहाजावरील तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या (इंजिन चालक) परीक्षा घेणे इत्यादी कामे १ मे २००० पासून सुरू करण्यात आली आहेत.

७. स्थापत्य अभियांत्रिकी शाखेचे पुढीलप्रमाणे कामे आहे.

(१) बंदरांचा विकास करणे.

(२) बंदरालगतच्या सुविधा निर्माण करणे.

(३) प्रवाशांसाठीच्या सुखसोयीविषयक कामे करणे.

(४) नौकानयन संदर्भातील स्थापत्य अभियांत्रिकी कामे.

(५) बंदरापर्यंत रस्ते मार्गाचे बांधकाम करणे.

(६) ब्रेकवॉटरसंबंधी बांधकामे.

(७) अंतर्गत जलवाहतुकीचा विकास करणे.

(८) तरंगते धक्के (Flotting Jetty).

(ब) समग्र कार्यक्रम

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची मुख्य कामे म्हणजे बंदर व अंतर्गत जलवाहतूक यांचे प्रशासन, लहान बंदराचा खाजगी क्षेत्रास सहभागी करून विकास व देखभाल, सागरी वाहतुकीसंबंधीच्या कायदेकानूनची अंमलबजावणी, सागरी जलवाहतूक व नौकानयन, जलसर्वेक्षण, प्रवाशांच्या सुखसोयी, नौकानयनाविषयी सुविधा, बंदरातील बांधकामे, बंदराअंतर्गत मार्गदर्शन व नौकांचे सर्वेक्षण, गाळ काढणे, जहाज ताफ्यांची खरेदी व देखभाल, तांडेल व खलाशांचे प्रशिक्षण व संरक्षणात्मक बाबी इत्यादी आहेत. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डात मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमुख असून, मुख्य बंदर अधिकारी, मुख्य अभियंता, जल आलेखक व सागरी अभियंता हे अधिकारी असून ते आपापल्या विभागांचे विभाग प्रमुख आहेत.

सर्वसाधारण माहिती

२०२१-२०२२ साठी अंदाजपत्रकात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या पुढील महत्त्वाच्या कामांसाठी तरतूद सुचविण्यात आली आहे :--

(अ) बंदरे व दीपगृहे

(१) जल आलेखन सर्वेक्षण आणि इतर संशोधन (राज्यस्तरीय रुपये ०० कोटी) (३०५१०७०३)

यात प्रामुख्याने बंदराचे विकास व धूपप्रतिबंधक उपायांसाठी लागणारे जलसर्वेक्षण व त्यासाठी करावयास लागणाऱ्या प्रतिमान चाचणी व प्रतिकृती अभ्यास करण्यासाठी येणारा खर्च यांचा समावेश आहे. सन २०२१-२०२२ या वर्षाकरिता रुपये ०० कोटी एवढा नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे.

सदरच्या योजनेखाली सन २०१६-१७ पासून शासनाकडून कोणताही निधी प्राप्त झालेला नाही. सदरची योजना बंद करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(२) बंदरालगतच्या सुविधा (जिल्हास्तरीय योजना)

यात मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध बंदरांतील धक्क्यांची दुरुस्ती, जोडरस्ता बांधणे, विद्युतीकरण तत्संबंधी बांधकामे इत्यादींच्या खर्चाचा समावेश आहे. सदर कामाकरिता सन २०२०-२०२१ मध्ये रुपये १४.९४ कोटी एवढा निधी प्राप्त झालेला आहे.

(३) प्रवाशांसाठी सुखसोयी व इतर स्थापत्य अभियांत्रिकी कामे (जिल्हास्तरीय योजना)

या योजनेअंतर्गत मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बंदरांच्या ठिकाणी प्रवाशांसाठी लागणाऱ्या विविध सुविधांचा समावेश होतो. उदाहरणार्थ--पाणीपुरवठा, शेड्स इत्यादी यासाठी सन २०२०-२०२१ मध्ये रुपये ०० कोटी एवढा निधी प्राप्त झालेला आहे.

(४) गाळ उपसणे (राज्यस्तरीय योजना रुपये ३३.०० कोटी)

या योजनेनुसार बंदरातील गाळ काढण्याची मोठी कामे हाती घेण्यात येतात. सन २०२२-२०२३ करिता काही बंदरांतील मोठ्या प्रमाणात गाळ काढणे या कामासाठी रुपये ३३.०० कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

(५) नौवाहनाची, नौसमूह व साधनसामग्री यांची खरेदी (राज्यस्तरीय रुपये ०.०० लाख)

सन २०२१-२०२२ करिता नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला नाही.

(६) नौकानयन सुविधा (जिल्हास्तरीय योजना)

नौकानयन सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शक दिवे, बोये इत्यादी सोयी बंदरात पुरविण्यात येतात.

(७) बंदरापर्यंत रोड/रेल्वे मार्ग बांधणे आणि ब्रेकवॉटर विकास (राज्यस्तरीय रुपये ६६.०० कोटी)

बंदरांचा विकास BOT/BOOST तत्त्वावर खाजगी उद्योजकांच्या सहभागाने करून घ्यावयाचा आहे. तरी या कामासाठी बंदरापासून रस्ते रेल्वेपर्यंत पोचमार्ग बांधण्याची अत्यंत आवश्यकता आहे. सन २०२१-२०२२ करिता रुपये ६६.०० कोटी नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे.

(८) तरंगती जेट्टी व तत्सम सुविधा उभारणे (राज्यस्तरीय रुपये ६३.५१ कोटी)

या योजनेनुसार बंदरामध्ये जेट्टी/तरंगती जेट्टी व त्यानुषंगाने इतर मूलभूत सुविधा निर्माण करणे या प्रकारची कामे केली जातात. सन २०२१-२२ करिता रुपये ६३.५१ कोटी इतका नियतव्यय मंजूर आहे.

(९) सागरमाला योजना (राज्य हिस्सा ५० टक्के) ३०५१-१८९१

सागरमाला योजनेंतर्गत अस्तित्वातील बंदरांचे आधुनिकीकरण, नवीन जागतिक दर्जाच्या बंदरांची निर्मिती, रस्ते व रेल्वेद्वारे बंदर जोडणी, तसेच आंतरर्देशिय जलमार्गाचा विकास, किनारपट्टीवरील सामाजिक घटकांचा विकास या प्रमुख बाबींचा समावेश आहे. सदर योजनेंतर्गत मान्यताप्राप्त प्रकल्पांना केंद्र शासनातर्फे ५० टक्के निधी व राज्य शासनातर्फे ५० टक्के निधी उपलब्ध केला जातो.

सन २०२१-२२ मध्ये राज्य शासनाने रुपये १११.०८ कोटी इतका नियतव्यय मंजूर आहे.

(ब) अंतर्गत जलवाहतूक (३०५६००५५)

(१) जल आलेखन सर्वेक्षण आणि इतर संशोधन (राज्यस्तरीय योजना रुपये ३.९७ कोटी)

यात प्रामुख्याने बंदर विकास, अंतर्गत जलवाहतूक व धुपप्रतिबंधक कामाच्या दृष्टीने खाड्यांतील जलसर्वेक्षण याचा समावेश होतो. या योजनेसाठी सन २०२०-२१ करिता शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक अर्थस-२०२०/प्र.क्र. ६५/अर्थ-३, दिनांक ४ मे २०२० अन्वये कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे, शासनाच्या आदेशान्वये ३३ टक्के कार्यक्रमावरील खर्च निधीच्या मर्यादेत ०.१५ कोटी निधी नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे.

(२) खाडी बंदरालगतच्या सुखसोयी व प्रवासी सुखसोयी (जिल्हास्तरीय योजना)

खाड्यांमधील प्रवाशांसाठी विविध सुखसोयी व जलवाहतुकीसाठी धक्के, प्रवासी निवारे, पाणीपुरवठा इत्यादी पुरविणे, ही कामे करण्यात येतात. सदर कामाकरिता सन २०२१-२०२२ मध्ये रुपये ३.९० कोटी एवढा निधी प्राप्त आहे.

वार्षिक योजना २०२१-२०२२

१.०१. महाराष्ट्राला ७२० कि. मी. लांबीची दंतूर किनारपट्टी लाभली आहे. त्यावर उत्तरेकडे डहाणूपासून ते दक्षिणेकडे किरणपाणीपर्यंत बंदरे व २ मोठी, ४८ छोटी बंदरे आहेत. सर्व बंदरे मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांत विभागलेली आहेत. किनारपट्टीवर वाहतूकयोग्य ९ मुख्य खाड्या असून अंतर्गत जलवाहतुकीच्या विकासासाठी योग्य आहेत.

१.०२. बंदरालगतच्या खेड्यांमध्ये उतारू व मालवाहतुकीसाठी सेवा/सुविधा उपलब्ध करण्याचे काम या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे आहे.

१.०३. महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील ४८ लहान बंदर हद्दीपैकी काही बंदरांत निर्माण करण्यात आलेल्या बंदर/जेट्टी सुविधांच्या माध्यमांतून लोहखनिज, कोळसा, सिमेंट, क्लिंकर, कंटेनर्स, लाईमस्टोन, डोलोमाईट, रॉक फॉस्फेट, स्टील कॉईल, बॉक्साईट, मिल स्केल, प्रोजेक्ट कार्गो, मोलॅसिस, म्युरेट ऑफ पोटॅश, साखर, इथिलीन, इथिलीन डायक्लोराईड, व्ही. सी. एम. इत्यादी विविध प्रकारच्या मालाची हाताळणी करण्यात येते. सन २०१८-२०१९, २०१९-२०२०, २०२०-२०२१ व २०२१-२०२२ मध्ये (अपेक्षित) हाताळण्यात आलेली व २०२२-२०२३ मध्ये (अंदाजित) मालवाहतूक खालीलप्रमाणे आहे :--

वर्ष		लाख मेट्रीक टन	
२०१८-२०१९	..	४५८.००	
२०१९-२०२०	..	४३७.००	
२०२०-२०२१	..	३९८.००	
२०२१-२०२२	..	४६०.००	(अपेक्षित)
२०२२-२०२३	..	५०६.००	(अंदाजित)

सन २०१८-२०१९ व २०१९-२०२०, २०२०-२०२१, २०२१-२०२२ मध्ये (अपेक्षित) व २०२२-२०२३ (अंदाजित) मध्ये खालीलप्रमाणे उतारू वाहतूक झाली आहे व अपेक्षित आहे :--

वर्ष		उतारू संख्या (लाखात)	
२०१८-२०१९	..	१९३.००	
२०१९-२०२०	..	१५९.००	
२०२०-२०२१	..	८२.००	
२०२१-२०२२	..	१२०.००	(अपेक्षित)
२०२२-२०२३	..	१५०.००	(अंदाजित)

१.०४. राज्याच्या किनारपट्टीवरील स्वनियंत्रित धक्के बहुउद्देशीय धक्के यांच्या व्यतिरिक्त धामणखोल जयगड (जिल्हा रत्नागिरी), लावगण-जयगड (आंग्रे) आणि दिघी ह्या बंदरातून बारमाही मालहाताळणी होते. खाजगी उद्योजकांना जेट्टी सुविधा निर्माण करून माल हाताळणीचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत असून त्यादृष्टीने आवश्यक सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

सन २०१८-२०१९ व २०१९-२०२०, २०२०-२०२१, २०२१-२०२२ मध्ये (अपेक्षित) व २०२२-२०२३ (अंदाजित) मध्ये मिळालेला महसूल खालीलप्रमाणे आहे :--

वर्ष		(रुपये कोटींमध्ये)	
२०१८-२०१९	..	१८०.८१	
२०१९-२०२०	..	१९४.३१	
२०२०-२०२१	..	१८३.११	
२०२१-२०२२	..	२२२.४१	(अपेक्षित)
२०२२-२०२३	..	२३०.००	(अंदाजित)

१.०५ महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून खालील योजना राबविल्या जातात :--

(अ) बंदरे व दीपगृहे (छोट्या बंदराची सुधारणा व धूपप्रतिबंधक बंधारे)

(ब) अंतर्गत जलवाहतूक

(क) पूरनियंत्रण

(ड) पूरनियंत्रण प्रकल्पासाठी कर्ज

वरील योजनांमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो :--

(अ) बंदरे व दीपगृहे

(१) जल आलेखन सर्वेक्षण व इतर संशोधन (राज्यस्तरीय),

(२) बंदरांजवळच्या सोयी (जिल्हास्तरीय),

(३) उतारू, सुखसोयी व स्थापत्यविषयक इतर बांधकामे (जिल्हास्तरीय),

(४) बंदरातील गाळ काढणे (Capital Dredging at Ports) (राज्यस्तरीय),

(५) नौसमूहाची खरेदी (राज्यस्तरीय),

(६) नौकानयन साधने (जिल्हास्तरीय),

(७) बंदरापर्यंत रोड/रेल्वेमार्ग बांधणे आणि ब्रेकवॉटर विकास (राज्यस्तरीय),

(८) तरंगती जेट्टी बांधणे.

(ब) अंतर्गत जलवाहतूक

(१) जल आलेखन, सर्वेक्षण व इतर संशोधन (राज्यस्तरीय),

(२) खाडी बंदरावरच्या प्रवासी सोयी (जिल्हास्तरीय),

(क) पूरनियंत्रण

(१) आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित शाश्वत किनारा संरक्षण व व्यवस्थापन गुंतवणूक कार्यक्रम.

(२) सागरी धूप प्रतिबंधक बांधकामे

(ड) पूरनियंत्रण प्रकल्पासाठी कर्ज

(१) आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित शाश्वत किनारा संरक्षण व व्यवस्थापन गुंतवणूक कार्यक्रम.

जल आलेखन सर्वेक्षण व इतर संशोधन (राज्यस्तरीय) ३०५१-०७०३

सदरच्या योजनेखाली सन २०१६-१७ पासून शासनाकडून कोणताही शासन निधी प्राप्त झालेला नाही. सदरची योजना बंद करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

नौसमूहाची खरेदी (राज्यस्तरीय)

२.२ सन २०२२-२०२३ या वर्षाकरिता नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला नाही

गाळ उपसणे (राज्यस्तरीय)

२.३ या योजनेनुसार बंदरातील गाळ काढण्याची मोठी कामे हाती घेण्यात येतात. सन २०२२-२०२३ साली काही बंदरांतील मोठ्या प्रमाणावर गाळ काढणे या कामासाठी रुपये ३३.०० कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

बंदरापर्यंत रोड/रेल्वेमार्ग बांधणे आणि ब्रेकवॉटर विकास (राज्यस्तरीय)

२.४ बंदरांचा विकास BOT/BOOST या तत्त्वावर खाजगी उद्योजकांच्या सहभागाने करून घ्यावयाचा आहे. सन २०२१-२०२२ या वर्षाकरिता रुपये ६६.०० कोटी नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे.

बंदरालगतच्या (धक्क्याजवळच्या) सुखसोयी (जिल्हास्तरीय)

२.५ या योजनेखालील धक्क्यांची बांधकामे/सुधारणा, विद्युतीकरणाची सोय/आधुनिकीकरण, बंदराकडे जाणाऱ्या रस्त्यांचे बांधकाम इत्यादी कामे घेतली जातात. यासाठी सन २०२०-२१ मध्ये रुपये १४.९४ कोटी एवढा निधी प्राप्त झालेला आहे.

प्रवासी सुखसोई (जिल्हास्तरीय)

२.६ या योजनेखाली बंदरामध्ये उतारूंसाठी विश्रांतिस्थाने, प्रतीक्षागृहे, पाणीपुरवठा, स्वच्छतागृहे, धक्क्यांच्या सुधारणा, गाड्या उभ्या करण्यासाठी जागा, बंदराकडे जाणारे रस्ते इत्यादी कामे घेतली जातात. सन २०२०-२१ मध्ये रुपये ३.९० कोटी एवढा निधी प्राप्त झालेला आहे.

नौकानयन सुविधा (जिल्हास्तरीय)

२.७ नौकानयनाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शक दिवे, बोये इत्यादी सोयी बंदरात पुरविण्यात येतात.

२.८ तरंगती जेट्टी व तत्सम प्रवासी सुविधा उभारणे.

सदर योजनेसाठी सन २०२०-२०२१ करिता रुपये ००० कोटी नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

३. अंतर्गत जलवाहतूक

जल आलेखन सर्वेक्षण आणि इतर संशोधन (राज्यस्तरीय) (३०५६००५५)

३.१ राज्यामध्ये असलेल्या ६७ खाड्यांपैकी मुख्य अशा ९ खाड्या आहेत व त्यांचा वापर उतारू व मालवाहतुकीसाठी करण्यात येतो. बहुतांश सर्व खाड्यांचे सर्वेक्षण झालेले असून भारतीय आंतरदेशीय जलमार्ग प्राधिकरण, भारत सरकार यांच्या शिफारशीप्रमाणे जे जलमार्ग आहेत त्यांची वाहतुकी योग्य क्षमता किती आहे हे समजण्यासाठी जलसर्वेक्षण करून त्याचा डेटा अद्ययावत करण्यात येतो. अशा जल आलेखन सर्वेक्षण व इतर संशोधनासाठी २०२१-२२ या वर्षासाठी रुपये ३.९७ कोटी एवढा नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे.

बंदरालगतच्या (धक्क्याजवळच्या) सुखसोई व उतारू सुखसोई

३.०२ प्रवासी वाहतूक व पर्यटनाला चालना देण्यासाठी किनारपट्टीवरील खाडीकिनारी खालील ठिकाणी रो-रो प्रवासी जलवाहतुकीसाठी जेट्या बांधण्यात आल्या आहेत व तेथून प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

(१) बाणकोट खाडीत वेश्वी ते कोलमांडला

(२) दाभोळ खाडीत दाभोळ ते धोपवे

(३) जयगड खाडीत तवसाळ ते जयगड

(४) राजपुरी खाडीत आगरदांडा ते दिघी

ह्या रो-रो प्रवासी जलवाहतूक सेवांमुळे प्रवाशांना त्यांच्या वाहनासहित प्रवास करणे शक्य झाल्यामुळे रस्त्यामार्गे कापावे लागणारे सुमारे ७०-८० कि.मी. अंतर कमी झाले आहे. त्यामुळे प्रवाशांचा वेळ व पैसा यांची बचत होण्याबरोबरच रस्त्यांवरील वाहतूक कोंडी काही प्रमाणात कमी होऊन इंधनखर्च बचत व पर्यावरण प्रदुषणास काही प्रमाणात प्रतिबंध होण्यास साहाय्य झाले आहे. उपरोक्त रो-रो सुविधांच्या धर्तीवर किनारपट्टीवर अन्य ठिकाणी अशा सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

मुंबईतील वाहतूक कोंडीच्या समस्येवरील उपायांचा एक भाग म्हणून शासनाने मुंबईच्या पूर्व किनारपट्टीवर फेरी व्हार्फ ते मांडवा आणि फेरी व्हार्फ ते नेरुळ अशा जलवाहतुकीस मान्यता दिलेली आहे. फेरी व्हार्फ आणि मांडवा येथे अनुक्रमे मुंबई बंदर विश्वस्त आणि महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड यांनी रो-रो जलवाहतुकीसाठी पायाभूत सुविधांची उभारणी केली आहे. रो-रो प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाने ऑपरेटर संस्थेशी दिनांक ३ डिसेंबर २०१९ रोजी करारनामा साक्षांकित केला आहे. ही सेवा मार्च-२०२० पासून कार्यान्वित झाली आहे. या रो-पॅक्स प्रवासी वाहतुकीसाठी आणण्यात आलेल्या जहाजाची एकाच वेळी १२० वाहने व ५०० प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे. या सेवेमुळे प्रवाशांना आपल्या वाहनांसहीत भाऊचा धक्का ते मांडवा हा प्रवास ५० मिनिटात व मांडव्याहून पुढे अलिबागपर्यंत ३० मिनिटात असा मुंबई ते अलिबाग हा प्रवास फक्त दीड तासात करणे शक्य झाले आहे. या रो-पॅक्स सेवेमुळे रायगड जिल्हा व कोकणातील इतर भागांतील पर्यटनाला मोठी चालना मिळाली आहे.

नेरूळ, नवी मुंबई येथील जलवाहतुकीच्या टर्मिनलची व इतर पायाभूत सुविधांची निर्मिती सिडको प्रशासनामार्फत करण्यात येत असून मे-२०२३ पर्यंत हे टर्मिनल तयार होणे अपेक्षित आहे. त्यानंतर गेटवे ऑफ इंडिया / भाऊचा धक्का येथून नेरूळ अशी प्रवासी वाहतूक सुरू करण्यात येईल.

फेरी व्हार्फ, मुंबई ते दिघी (जि. रायगड) अशी रो-रो जलप्रवासी वाहतूक चालविण्यासाठी खाजगी उद्योजकांचा प्रस्ताव प्राप्त झाला असून, त्यावर उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

देशाच्या सागरी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाने "सागरमाला" हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमांतर्गत सागरी पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी किनारी राज्यांना निधी उपलब्ध करून दिला जातो.

"सागरमाला" या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत मांडवा, भाईंदर, बेलापूर व मालवण येथे जेट्टीचे काम पूर्ण झाले आहे. तसेच खारवाडेशी येथील जेट्टीवरील पोच रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे.

सागरमाला योजनेखाली मुंबई व नजीकच्या परिसरात, गोराई, वसई, नारंगी, खारखाडेश्वरी, मनोरी, घोडबंदर, बोरीवली, बेलापूर तसेच रायगड जिल्ह्यात रेवस, करंजा, काशिद आणि रत्नागिरी जिल्ह्यात वेलदूर येथे प्रवासी वाहतुकीच्या विविध पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात आली आहेत. या प्रकल्पांमुळे राज्याच्या किनारपट्टी भागात प्रवासी जलवाहतुकीस व पर्यटनास प्रोत्साहन मिळणार आहे.

वसई-ठाणे-कल्याण (राष्ट्रीय जलमार्ग-५३) या जलमार्गात प्रवासी जलवाहतूक सुरू करण्यासाठी मीरा-भाईंदर, कोलशेत, काल्हेर आणि डोंबिवली येथे प्रवासी जेट्टी व टर्मिनल सुविधा निर्माण करण्याचे प्रस्तावित असून या टर्मिनलच्या प्रस्तावांना केंद्रशासनाने 'सागरमाला' योजनेअंतर्गत मंजुरी प्रदान केली आहे. तसेच सदर प्रकल्पांना पर्यावरण विषयक दाखला प्राप्त करून घेण्याची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. पर्यावरण विषयक दाखला प्राप्त झाल्यानंतर सदरची ४ कामे हाती घेण्यात येतील.

दक्षिण मुंबई जलमार्गाने नवी मुंबईला जोडण्यासाठी फेरी व्हार्फ ते बेलापूर, वाशी, ठाणे अशी हॉवरक्राप्ट सेवा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाने जुलै-२०१८ मध्ये खाजगी ऑपरेटरला इरादापत्र (Letter of Intent) दिलेले आहे. सन २०२१ मध्ये ही सेवा सुरू होणे अपेक्षित आहे.

याशिवाय नवी मुंबईमध्ये बेलापूर येथे किनारपट्टीवरील पहिला मरीना प्रकल्प उभारण्यासाठी खाजगी विकासक कंपनीला नोव्हेंबर-२०१७ मध्ये परवानगी देण्यात आली आहे. विकासकामार्फत मरीना प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आला आहे. State Level Environment Assessment Authority यांनी दिनांक २० जुलै २०२० अन्वये मरिना प्रकल्पाला सीआरझेड दाखला प्रदान केला आहे.

३.०३ क्रॉस फेरीसाठी असे धक्के बांधण्याव्यतिरिक्त या योजनेखाली धक्के व पकट्या बांधणे, बंदराकडे जाणारे रस्ते तयार करणे अशी कामे घेतली जातात. वांद्रे-वरळी सागरी सेतूनजिक असलेल्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या जेट्टीवरून तरंगते उपहारगृह प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. त्यामुळे मुंबईत येणाऱ्या पर्यटकांना आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे.

३.०४ खाडी बंदरालगतची बांधकामे या कामासाठी सन २०२०-२०२१ मध्ये रुपये ३.९० कोटी एवढा निधी प्राप्त झालेला आहे.

३.०५ किनारपट्टीनजीक स्थापन करण्यात येणाऱ्या उद्योगधंद्यांकरिता मालाची ने-आण करण्यासाठी शासनाच्या कॅप्टिव्ह जेट्टीविषयक धोरणास अनुसरुन कॅप्टिव्ह जेट्टी प्रकल्प उभारण्यासाठी परवानगी मिळणेबाबत खाजगी उद्योजकांकडून महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे प्रस्ताव प्राप्त होत असतात. त्यानुसार सद्य:स्थितीत खाजगी उद्योजकांना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या परवानगीने रेवदंडा, उल्वा-बेलापूर, धरमतर, रत्नागिरी-रनपार (पावस) व दाभोळ या बंदरांत त्यांच्या विशिष्ट मालाची वाहतूक करण्यासाठी स्वखर्चाने जेट्टी बांधून मालवाहतुकीस सुरुवात केली आहे. आणखीही बऱ्याचशा उद्योजकांचे प्रस्ताव विचाराधीन आहेत. त्यामुळे भविष्यकाळात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या महसुलात निश्चित वाढ होण्याची शक्यता आहे. खाजगी क्षेत्राच्या सहभागास उत्तेजन देण्याच्या दृष्टीने बिल्ड, ऑपरेट ॲण्ड ट्रान्सफर (B. O. T.) या पद्धतीवर उभारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. म्हणजे ही सुविधा औद्योगिक घटकांमार्फत उभारली जाईल, वापरली जाईल आणि कार्यान्वित केली जाईल व काही कालावधीनंतर शासनास हस्तांतरित केली जाईल. मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व व्यवस्था केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केली जाईल.

खाजगी घटक महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याबरोबर करारनामा करतील. या करारनाम्यामध्ये स्वत:च्या जबाबदारीवर खाजगी घटक स्वखर्चाने जेट्टी व इतर नौवहन सुविधा निर्माण करतील.

सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेले स्वनियंत्रित धक्के.

अनु. क्रमांक	बंदराचे नाव	धक्क्याचा वापर करत असलेल्या कंपनीचे नाव	माल
१	२	३	४
१.	पनवेल (उल्वा-बेलापूर)	अंबुजा सिमेंट लि.,	बल्क सिमेंट
२.	अलिबाग (धरमतर)	जेएसडब्ल्यू धरमतर पोर्ट प्रा. लि.,	आयर्न ओर क्लिंकर कोक-कोल स्पॉर्ज आयर्न
३.	रेवदंडा	जेएसडब्ल्यू स्टील प्रा. लि.,	आयर्न ओर/पॅलेटस् फाईन हॉट ब्रेकेटेड आयर्न डायरेक्ट रिडयूस आयर्न.
४.	दाभोळ	कोकण एलएनजी लि.,	एलएनजी
५.	रत्नागिरी (पावस-रनपार)	फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि.,	एथोलिन डाय क्लोराईड
६.	रत्नागिरी (पावस-रनपार)	फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि.,	कोळसा
७.	बाणकोट	इन्फ्रास्ट्रक्चर लॉजिस्टिक्स प्रा. लि.,	बॉक्साईट

याशिवाय किनारपट्टीवर खालील बहुउद्देशीय जेट्टी प्रकल्प कार्यान्वित आहेत.
सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेले बहुउद्देशीय धक्के.

अनु. क्रमांक	बंदराचे नाव	धक्क्याचा वापर करत असलेल्या कंपनीचे नाव	माल
१	२	३	४
१.	अलिबाग (धरमतर)	पीएनपी मेरीटाईम सर्व्हिसेस प्राइव्हेट लिमिटेड	कोल, आयर्न ओर फाइन्स् सल्फर, बॉक्साईट
२.	रेवदंडा (सानेगाव)	इंडो एनर्जी इटरनॅशनल लिमिटेड,	कोळसा
३.	करंजा	करंजा टर्मिनल ॲण्ड लॉजिस्टिक्स प्रा. लि.,	स्टील प्लेस्ट्स, कोळसा

ट्रॉम्बे बंदराच्या अखत्यारित मे. योगायतन पोर्टस यांच्या बहुउद्देशीय जेट्टी प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे. योगायतन पोर्टस यांच्या जेट्टी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम जवळपास पूर्ण झाले असून अतिरिक्त धक्क्यांचे काम प्रगतीत आहे. लवकरच माल हाताळणीस प्रारंभ करणे अपेक्षित आहे.

कॅप्टिव्ह जेट्टी आणि बहुउद्देशीय जेट्टीव्यतिरिक्त महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मालकीच्या/अखत्यारितील काही जेट्टी खाजगी उद्योजकांना मालहाताळणीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जेणेकरून जलमार्गाने मालहाताळणीस चालना मिळेल. अशा जेट्टींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अनु. क्रमांक	बंदराचे नाव	धक्क्याचा वापर करत असलेल्या कंपनीचे नाव	माल
१	२	३	४
१.	डहाणू	मे. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.	कोळसा
२.	ट्रॉम्बे	मे. गोदरेज ॲण्ड बॉइज	कंपनीत उत्पादित येणारी अवजड उत्पादने
३.	रत्नागिरी	मे. अल्ट्रा टेक सिमेंट लि.	सिमेंट

याशिवाय पनवेल खाडीमध्ये उल्वा-बेलापूर बंदर हद्दीत तसेच भिवंडी बंदर हद्दीत कशेळी येथे अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या धक्क्यांचा अवजड यंत्रसामग्री (over Dimensional Cargo) हाताळण्यासाठी वापर करण्यासाठी विविध खाजगी घटकांना परवानग्या देण्यात येतात.

महाराष्ट्र हे शिपिंग क्षेत्राशी निगडित व्यवसायाचे अत्यंत महत्त्वाचे केंद्र असून, गेल्या अनेक वर्षात शिपिंग व्यवसायात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. सद्य:स्थितीत किनारपट्टीत शिपयार्डची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे जलयानांच्या देखभाल/दुरुस्तीसाठी अन्य किनारी राज्यात जावे लागते. त्यामुळे, महाराष्ट्राचा किनारपट्टीवर शिपयार्ड प्रकल्पांची निर्मिती होणे अत्यंत गरजेचे आहे. शिपयार्ड प्रकल्पांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होते. ह्या सर्व बाबी विचारात घेऊन राज्याच्या किनारपट्टीवर शिपयार्ड प्रकल्प निर्मितीसाठी खाजगी उद्योजकांना प्रोत्साहित करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत भारती शिपयार्ड ह्यांनी रत्नागिरी जिल्ह्यात मिऱ्या बंदर व उसगाव, दाभोळ येथे शीपयार्ड प्रकल्प उभारले आहेत. सद्य:स्थितीत भारती शिपयार्ड ही कंपनी दिवाळखोरीत गेल्यामुळे, NCLT यांच्याद्वारे नवीन विकासक निवडण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. मे. आंग्रे पोर्ट प्रा. लि. यांनी लावगण-जयगड येथे जहाज दुरुस्तीसाठी शिपलिस्ट सुविधा निर्माण केली आहे. या व्यतिरिक्त, किनारपट्टीवर अन्य ठिकाणी शिपयार्ड प्रकल्प उभारणीसाठी खालील खाजगी उद्योजकांना परवानग्या देण्यात आलेल्या आहेत.

अ.क्र.	बंदराचे नाव	प्रकल्प विकासकाचे नाव	प्रकल्पांची सद्य:स्थिती
१	२	३	४
१.	उल्वा बेलापूर	मे. मालदार शिपयार्ड प्रा. लि.	काम प्रगतीत आहे.
२.	उल्वा बेलापूर	मे. बेलापूर ऑफशोअर टर्मिनल एल.एल.पी.	पर्यावरण दाखला प्रतीक्षाधीन आहे.
३.	उल्वा बेलापूर	मे. रॉक ॲण्ड रीफ ड्रेजिंग प्रा. लि.	पर्यावरण दाखला प्राप्त झाला.
४.	कल्याण	मे. तिरुपती बालाजी मरीन एन्टरप्रायझेस	पर्यावरण दाखला प्राप्त झाला आहे.
५.	धरमतर	मे. मरीन फंटियर प्रा. लि.	प्रकल्प कार्यान्वित
६.	अलिबाग	मे. कोकण बार्ज बिल्डर्स प्रा. लि.	प्रकल्प कार्यान्वित

शिपयार्ड प्रकल्प निर्माण करण्यासाठी पनवेल खाडीमध्ये उल्वा-बेलापूर बंदर हद्दीत बेलपाडा येथे खाजगी उद्योजकांकडून निविदा मागविण्याची बाब प्रस्तावित आहे. हे ठिकाण मुंबईपासून नजिक असून, रस्ते व रेल्वे मार्गाने सुलभरित्या जोडले असल्याने शिपयार्ड सुविधा विकसित होण्यास उत्तम वाव आहे.

३.०६ खाजगी क्षेत्राच्या सहभागाद्वारे बंदर सुविधांचा विकास आणि नवीन बंदर विकास धोरण-२०१६

महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीवरील लहान बंदरांचा विकास हा खाजगी क्षेत्राच्या सहभागाने करण्याचे धोरण शासनाने अंगिकारले असून, त्यानुसार सद्य:स्थितीत रायगड जिल्ह्यातील दिघी आणि रेवस-आवरे, रत्नागिरी जिल्ह्यातील धामणखोल-जयगड आणि लावगण-जयगड (आंग्रे) तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग आणि रेडी या बंदर प्रकल्पांसाठी खाजगी विकासक कंपन्यांशी सवलत करारनामे सांक्षांकित करण्यात आले.

दिघी बंदर विकास प्रकल्पासाठी बालाजी समूहाच्या मे. बालाजी लिजींग ॲण्ड इंडस्ट्रिज कंपनी लि., यांच्याशी सन २००२ मध्ये सवलत करारनामा सांक्षांकित करण्यात आला होता व हा प्रकल्प मे. दिघी पोर्ट लि. या विशेष हेतू कंपनी (Special Purpose Vehicle) मार्फत चालविण्यात येत होता. मूळ विकासक कंपनी दिवाळखोरीत गेल्यामुळे, दिघी पोर्ट प्रकल्प ताब्यात घेण्यासाठी नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (NCLT) यांनी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून, अदानी समूहाच्या मे. अदानी पोर्टस् ॲण्ड एसईझेड लि. या नवीन विकसक कंपनीचा प्रस्ताव मंजूर केला. अदानी पोर्टस् ॲण्ड एसईझेड लिमिटेड, यांनी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मान्यतेअंती, दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी दिघी बंदराचे व्यवस्थापन व कार्यचालन ताब्यात घेतले असून, त्यांच्यामार्फत कारभार चालविण्यात येत आहे.

रेवसे-आवरे या बंदर प्रकल्पाच्या मुंबई बंदर विश्वस्त यांच्या बंदर हद्दीतून जाणाऱ्या प्रस्तावित नौवहन मार्गाकरिता त्यांच्याकडून विनामूल्य परवानगी अद्याप प्राप्त व्हायची असल्यामुळे बंदराच्या बांधकामास प्रत्यक्ष सुरूवात करणे शक्य झालेले नाही. तथापि, प्रकल्पासाठी आवश्यक अभ्यास पूर्ण करण्यात आले आहेत.

धामणखोल-जयगड (जिल्हा रत्नागिरी) हे बंदर जेएसडब्ल्यू समूहाच्या जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लि. या कंपनीमार्फत विकसित करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत एकूण सहा धक्क्यांवरून विविध प्रकारचा माल हाताळण्यात येतो. या बंदरात सुमारे २० मीटर इतकी खोली असून २,००,००० टन क्षमतेचे जहाज थेट धक्क्याला लागू शकते. या बंदरातून एलएनजी आणि एलपीजी हा कार्गो हाताळण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा कंपनीने उभारल्या आहेत. केंद्र शासनाकडून याबाबतची अधिसूचना जारी झाल्यानंतर या कार्गोची हाताळणी सुरू होईल.

लावगण-जयगड (जिल्हा रत्नागिरी) येथे चौगुले समूहाच्या आंग्रे पोर्ट प्रा. लि. या कंपनीने बंदर उभारले असून, त्यामध्ये मालहाताळणीसाठी धक्का आणि जहाज दुरुस्तीसाठी अत्याधुनिक शीपलिफ्ट सुविधा निर्माण केली आहे. या सुविधेमुळे जहाज दुरुस्तीसाठी उत्तम सुविधा उपलब्ध झालेली आहे. याशिवाय मुंबई ते गोवा या जलमार्गावर चालणाऱ्या क्रूझ जहाजांसाठी सुद्धा या बंदरात थांबा उपलब्ध आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग येथे बंदर विकास करण्यासाठी करारबद्ध करण्यात आलेली विकासक कंपनी विहित कालावधीत अपेक्षित प्रगती साध्य करण्यास असमर्थ ठरल्याने, त्यांचा करार रद्द करण्यात आला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडी येथे बंदराचा विकास करण्यासाठी रेडी पोर्ट लि. या कंपनीशी सवलत करारनामा सांक्षांकित करण्यात आला आहे. बंदर प्रकल्पासाठी लागणारे दाखले कंपनीने प्राप्त केले असून, अन्य बांधकामपूर्व बाबी प्रगतीत आहेत. सद्य:स्थितीत, रेडी बंदर येथील यापूर्वी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या जेट्टीवरून कंपनी मालहाताळणी करीत आहे.

वरील बंदर प्रकल्पांव्यतिरिक्त जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त (जेएनपीटी) यांचेकरिता सॅटेलाईट पोर्ट म्हणून पालघर जिल्ह्यामध्ये डहाणू तालुक्यात वाढवण येथे मोठे बंदर (Major Port) निर्माण करण्याच्या प्रकल्पास केंद्र शासनाने फेब्रुवारी-२०२० मध्ये मान्यता दिली आहे. हा प्रकल्प जेएनपीटी यांच्यामार्फत राबविण्यात येत असून, त्यामध्ये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचा सहभाग २६ टक्के आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पासाठी विविध दाखले प्राप्त करण्यासाठी जेएनपीटी यांच्यामार्फत आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

खाजगी क्षेत्राच्या सहभागाने बंदरांचा विकास करण्यासंदर्भात "बंदर विकास धोरण" शासनाने सन १९९६ मध्ये जाहीर केले. त्यानंतर बंदर क्षेत्रामध्ये त्या-त्या वेळची परिस्थिती, या क्षेत्राशी संबंधित घटकांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा व मागण्या तसेच शासनाकडून बंदरे क्षेत्राला चालना देण्याची गरज या बाबी ध्यानात घेऊन धोरणामध्ये वेळोवेळी म्हणजे सन २०००, २००२, २०१० आणि २०१६ मध्ये सुधारणा करण्यात आल्या. बंदर विकास धोरण-२०१६ हे सर्वसमावेशक असून त्यात हरितक्षेत्र बंदरे, कॅप्टिव्ह जेट्टी, बहुउद्देशिय जेट्टी, शीपयार्ड, किनारी नौपरिवहन, अंतर्देशिय जलमार्ग विकास इत्यादी क्षेत्रांसंदर्भातील तरतुदी समाविष्ट आहेत. हे धोरण अधिकाधिक लवचिक, गुंतवणुकीस पोषक आणि बंदरविषयक प्रकल्पांकरिता अनुकूल व्हावे यादृष्टिने शासनाने १९ जुलै २०१९ च्या शासन निर्णयाद्वारे त्यामध्ये आणखी सुधारणा केल्या आहेत.

बंदरे क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांचे फलित म्हणून लहान बंदरांमधून हाताळण्यात येत असलेल्या मालहाताळणीमध्ये मागील ५ वर्षांत सुमारे ७० टक्के इतकी वाढ झालेली आहे. मुंबई बंदर विश्वस्त आणि जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त ही महाराष्ट्रातील मोठी दरवर्षी करीत असलेल्या अनुक्रमे ६० दशलक्ष टन आणि ७० दशलक्ष टन मालहाताळणीच्या तुलनेत राज्यातील लहान बंदरांमधून सुमारे ४० ते ४३ दशलक्ष टन इतका माल दरवर्षी हाताळला जात आहे. राज्याच्या आर्थिक-सामाजिक विकासात बंदर क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान लक्षात घेता, ह्या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी लक्ष केंद्रीत करण्यात आले असून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

३.७ एशियन डेव्हलपमेंट बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक किनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्प

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने एशियन डेव्हलपमेंट बँक अर्थसहाय्यित " महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक किनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्प" दिनांक ५ मार्च २०२० रोजी मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मंजूर करण्यात आला व त्या अनुषंगाने दिनांक २६ मार्च २०२० रोजी संदर्भिय शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

एशियन डेव्हलपमेंट बँक अर्थसहाय्यित "महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणापूरक किनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्प" हा नवीन कर्ज प्रस्तावंतर्गत करारनामा सांक्षाकिंत झाल्यापासून ५ वर्षे कालावधीत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(१) एडीबीचा कर्ज हिस्सा रुपये ४०५.४० कोटी

(२) राज्य शासनाचा हिस्सा रुपये १७३.७४ कोटी

(३) खाजगी क्षेत्राचा हिस्सा रुपये ६४.३५ कोटी

सन २०२०-२०२१ साठी लेखाशीर्ष-२७११०९२२ अंतर्गत रुपये ३.१९ कोटी पैकी रुपये ९५.७० लक्ष वितरीत करण्यात आले व लेखाशीर्ष-६७११००१५ अंतर्गत रुपये निरंक आहे.

सन २०२१-२०२२ साठी लेखाशीर्ष-२७११०९२२ अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पित निधी रुपये ५.२० कोटीमधून रुपये १.५० कोटी वितरीत करण्याबाबत व लेखाशीर्ष ६७११००१५ अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पित निधी रुपये ४.५५ कोटीमधून रुपये २.५० कोटी वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करण्यात आला आहे.

सन २०२२-२०२३ साठी लेखाशीर्ष-२७११०९२२ अंतर्गत रुपये २.५ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आला आहे व लेखाशीर्ष-६७११००१५ अंतर्गत रुपये ६ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आला आहे.

विभागीय संरचना

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

मुख्य कार्यकारी अधिकारी

- नौकानयन सल्लागार
- मुख्य बंदर अधिकारी
  - प्रादेशिक बंदर अधिकारी
    - वांद्रा
    - मोरा (ठाणे)
    - राजपुरी (अलिबाग)
    - रत्नागिरी
    - वेंगुर्ला
- जल आलेखक
- सागरी अभियंता व चिफ सर्व्हेअर
- वित्तीय नियंत्रक - नि - मुख्य लेखाधिकारी
- वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी
- मुख्य अभियंता
- उप-जिल्हाधिकारी
- सागरी सुरक्षा व संरक्षण अधिकारी
- महाव्यवस्थापक व्यवसाय विकास

प्रादेशिक बंदर अधिकारी यांचे अखत्यारित येणारी बंदरे

वांद्रा	मोरा (ठाणे)	राजपुरी (अलिबाग)	रत्नागिरी	वेंगुर्ला
१. डहाणू	१. वसई	१. थळ	१. बाणकोट	१. पूर्णगड
२. तारापूर	२. भिवंडी	२. अलिबाग	२. हर्णे	२. जैतापूर
३. नवापूर	३. कल्याण	३. रेवदंडा	३. केळशी	३. विजयदुर्ग
४. सातपाटी	४. ट्रॉम्बे	४. बोरली-मांडला	४. दाभोळ	४. देवगड
५. केळवा-माहिम	५. उल्वा-बेलापूर/ पनवेल.	५. नांदगाव	५. पालशेत	५. आचरा
६. अर्नाळा	६. मांडवा	६. मुरुड-जंजिरा	६. बोरया	६. मालवण
७. दातिवरे	७. मोरा	७. राजपुरी	७. जयगड	७. निवती
८. उत्तन	८. रेवस	८. दिघी	८. वरोडा	८. वेंगुर्ला
९. मार्वे-मनोरी	९. कारंजा	९. कुंभारू	९. रत्नागिरी	९. किरणपाणी
१०. वर्सोवा	१०. धरमतर	१०. श्रीवर्धन		१०. रेडी
११. वांद्रे	११. भाऊचा धक्का	११. मांदाड		
	१२. घारापुरी			
	१३. गेट वे ऑफ इंडिया.			
	१४. ठाणे बंदर			

(२) वित्तीय आवश्यकता **३०५१ बंदरे व दीपगृहे (क) एकूण अर्थसंकल्पाचा कार्यक्रमनिहाय तपशील**

(II) Financial Requirements **विवरणपत्र 'अ'**

अ. क्र. Sr. No.	कार्यक्रम		प्रत्यक्ष रकमा २०२०-२०२१ Actual 2020-2021	अर्थसंकल्प २०२१-२०२२ Budget Estimates 2021-2022
1	2		3	4
१	बांधकाम व दुरुस्ती--			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च	...	–	–
	एकूण	...	–	–
२	बंदर व्यवस्थापन--			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च	...	–	–
	एकूण	...	–	–
३	गाळ उपसणे व सर्वेक्षण			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च	...	–	–
	एकूण	...	–	–
४	निलंबन--			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च	...	–	–
	एकूण	...	–	–
५	इतर खर्च--			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च	...	–	–
	एकूण	...	–	–
	गृह विभाग मागणी क्र. बी-७ प्रशि-३०५१ बंदरे व दीपगृहे	...		
६	१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रम यांना सहायक अनुदान			
(०१)	महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास सहायक अनुदान			
(००) (०३)	जेट्टीच्या बांधकामाकरिता केंद्राचे अर्थसहाय्य (सागरमाला) (राज्य हिस्सा ५० टक्के) (कार्यक्रम)			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च	...	577500	2812800
	एकूण	...	577500	2812800

(C) Performance Budget in Details

Statement 'A' (रुपये हजारात / *Rs. in thousands*)

सुधारित अंदाज २०२१-२०२२ Revised Estimates 2021-2022	अर्थसंकल्पीय २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023	Programme
5	6	
		1 Construction and Repairs–
–	–	Committed Expenditure
–	–	Scheme Expenditure
–	–	Total
		2 Ports Management–
–	–	Committed Expenditure
–	–	Scheme Expenditure
–	–	Total
		3 Dredging and Surveying–
–	–	Committed Expenditure
–	–	Scheme Expenditure
–	–	Total
		4 Suspense–
–	–	Committed Expenditure
–	–	Scheme Expenditure
–	–	Total
		5 Other Expenditure
–	–	Committed Expenditure
–	–	Scheme Expenditure
–	–	Total
		Home Department Demand No. B-7 MH 3051 Port and Light Houses
		6 190 Assistance to Public Sector and other undertakings–
		(1) Grants-in-aid to Maharashtra Maritime Board–3051
		(00) (03) Central assistance for construction of Jetty (Sagarmala) (50 % State share) (Scheme)
–	–	Committed Expenditure
2132000	3446100	Scheme Expenditure
2132000	3446100	Total

1	2		3	4
	गृह विभाग मागणी बी-३ प्रशि--३०५६			
७	संचालक व प्रशासन--			
	१९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांना सहाय्य			
	महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास सहायक अनुदान--			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च	...	1400	39700
	एकूण	...	1400	39700
८	सागरी धूपप्रतिबंधक बांधकामे--			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)	...	–	–
	एकूण	...	–	–
९	इतर लहान बंदरे--			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च	...	–	–
	एकूण	...	–	–
१०	इतर खर्च (देशांतर्गत व जल-परिवहनाचा विकास)			
	अनिवार्य खर्च	...	–	–
	कार्यक्रमांवरील खर्च	...	–	–
	एकूण	...	–	–
	गृह विभाग मागणी बी-८ २७११			
११	१९० सार्वजनिक क्षेत्रातील आणि इतर उपक्रमांना सहाय्य			
(००)	(०१) आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित शाश्वत किनारा संरक्षण व व्यवस्थापन गुंतवणूक कार्यक्रम (२७११०९२२)			
	३१ सहायक अनुदान (वेतनेतर) कार्यक्रमांवरील खर्च	...	9570	52000
(००)	(०२) सागरी धूप प्रतिबंधक बांधकामे (२७११०९३१)			
	३१ सहायक अनुदान (वेतनेतर)	...		
	कार्यक्रमांवरील खर्च	...	–	–
एकूण	(०२) १९०, सार्वजनिक उपक्रम व इतर उपक्रमांना सहाय्य	...	9570	52000
२७११	पूर नियंत्रण एकूण दत्तमत	...	9570	52000

(C) Performance Budget in details

Statement 'A'–*contd.* (रुपये हजारात/*Rs. in thousands*)

5	6	2
		Home Department Demand No. B-3 MH-3056
		7 Direction and Administration– 190 Assistance to Public Sector and other undertakings–
		(01) Grants-in-aid to Maharashtra Maritime Board–
–	–	Committed Expenditure
23820	8900	Scheme Expenditure
23820	8900	Total
		8 Anti-Sea Erosion–
–	–	Committed Expenditure
–	–	Scheme Expenditure (Schemes in the Five Year Plan)
–	–	Total
		9 Other Small Ports–
–	–	Committed Expenditure
–	–	Scheme Expenditure
–	–	Total
		10 Other Expenditure (Development of Inland Water Transport).
–	–	Committed Expenditure
–	–	Scheme Expenditure
–	–	Total
		Home Department Demand No. B-8 2711
		11 190 Assistance to Public Sector and Other Undertaking–
		(00) (01) Asian Development Bank assisted Sustainable Coastal Protection and Management Investment Programme (27110222)
31200	25000	Voted 31. Grant-in-Aid (Non-Salary) Scheme Expenditure
		(00) (02) Construction of Anti Sea Erosion Bunds (27110931)
–	–	Voted 31. Grant-in-Aid (Non-Salary) Scheme Expenditure
31200	25000	Total (02) 190 Assistance to Public Sector and Other Undertakings
31200	25000	Voted Total 2711 Flood Control

(२) वित्तीय आवश्यकता **(क) एकूण अर्थसंकल्पाचा कार्यक्रमनिहाय तपशील**

(II) Financial Requirements **विवरणपत्र 'अ'**--चालू

1	2	3	4
	गृह विभाग मागणी बी--१२		
१२ (००) १९०	सार्वजनिक उपक्रम व इतर उपक्रमासाठी कर्ज		
(००)			
(००) (०१)	आशियाई विकास बँक अर्थ साहाय्यित शाश्वत किनारा संरक्षण व व्यवस्थापन गुंतवणूक कार्यक्रम (६७११ ००१५)		
५५	कर्जे व अग्रिमे	...	–	45500
एकूण (०२) १९०, सार्वजनिक उपक्रम व इतर उपक्रमांनासाठी कर्जे		...	–	45500
६७११ पूर नियंत्रण प्रकल्पासाठी कर्ज एकूण दत्तमत		...	–	45500

टीप : महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या स्थापनेमुळे योजनेतर व योजनांतर्गत शीर्षाखाली मुख्य लेखाशीर्ष ३०५१--बंदरे व दीपगृहे व ३०५६ अंतर्गत जलवाहतूक या खाली १९०--सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रम यांना साहाय्य, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास सहायक अनुदान या शीर्षाखाली तरतूद मंजूर करण्यात येत आहे.

*महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे महसुली जमा रकमा व योजनेतर खर्च लक्षात घेऊन योजनेतर खर्चापेक्षा, महसुली उत्पन्न अधिक असल्याने योजनेतर तरतूद शासनाकडून करण्यात आलेली नाही.

(C) Performance Budget in details

Statement 'A'–*contd.* (रुपये हजारात/*Rs. in thousands*)

5	6	
		Home Department Demand No. B–12
		(00) 190 Loans to Public Sector and Other Undertakings–
		(00)
		(00) (01) Asian Development Bank assisted Sustainable Coastal Protection and Management Investment Programme (6711 0015)
34125	60000	55 Loans and Advances
34125	60000	Total (02) 190 Loans to Public Sector and Other
34125	60000	Voted Total 6711 Loan for Flood Control Project.

Note.– Due to establishment of Maharashtra Maritime Board Provision for Non-Plan and Plan under Head 3051–Ports and Light Houses and Head 3056–Inland Water Transport. 190–Assistance to Public Sector and other undertaking financial assistance to Maharashtra Maritime Board provision made.

*As the revenue collection of Maharashtra Maritime Board is more than Non-Plan expenditure. Hence the provision for Non-Plan expenditure has not been budgeted by Government.

(क) एकूण अर्थसंकल्पाचा प्रधानशीर्ष कार्यक्रमनिहाय तपशील
विवरणपत्र 'ब'

कार्यक्रम क्रमांक Programme No.	तपशील	प्रत्यक्ष रकमा २०२०-२०२१ Actual 2020-2021	अर्थसंकल्पीय २०२१-२०२२ Budget Estimates 2021-2022
1	2	3	4
	३०५१--बंदरे आणि दीपगृहे--		
१	बांधकाम व दुरुस्ती ...	–	–
२	बंदर व्यवस्थापन ...	–	–
३	गाळ उपसणे व सर्वेक्षण ...	–	–
४	इतर खर्च--निलंबन ...	–	–
५	१९०-सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रम यांना सहायक अनुदान म. मे. बो. साहाय्यक अनुदान (योजनेतर) (३०५१०६९७)	–	–
६	१९०-सार्वजनिक क्षेत्र आणि इतर – उपक्रमांना सहाय्य	–	–
७	इतर खर्च विनियमन व निरीक्षण ...	–	–
	एकूण ...	–	–
	३०५६--अंतर्गत जलवाहतक		
८	संचालन व प्रशासन ...	–	–
	१९०-सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रम यांना सहायक अनुदान म. मे. बो. सहायक अनुदान (योजनेतर) (३०५६००४६)		
	एकूण ...	–	–
९	४७११--पूरनियंत्रण प्रकल्प (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना)	–	–
	सागरी धूपप्रतिबंधक बांधकाम ...	–	–
	एकूण ...	–	–
१०	३०५१--बंदरे आणि दीपगृहे यावरील भांडवली खर्च		
	१९०--सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना सहायक अनुदान म. मे. बो. ३१-सहायक अनुदान (लहान बंदरे विकास) (कार्यक्रमांवरील खर्च)	577500	2812800
	एकूण ...	577500	2812800

(C) Performance Budget of Major head programme in details
Statement 'B'

(रुपये हजारात/*Rs. in thousands*)

सुधारित अंदाज २०२१-२०२२ Revised Estimates 2021-2022	अर्थसंकल्पीय २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023	Programme
5	6	2
		3051–Ports and Light Houses–
–	–	(1) Construction and Repairs
–	–	(2) Ports Management
–	–	(3) Dredging and Surveying
–	–	(4) Other Expenditure (Suspense)
–	–	(5) 190–Assistance to Public Sector and Other undertaking. Grant-in-Aid to M. M. B. (Non-Plan) (30510697)
–	–	(6) 190–Assistance to public sector and other undertakings.
–	–	(7) Other Expenditure Regulation and Inspection.
–	–	Total
		3056–Inland Water Transport–
–	–	(8) Direction and Administration
		190–Assistance to Public Sector and Other undertakings. Grant-in-Aid to M. M. B. (Non-Plan) (30560046)
–	–	Total
		4711–Capital outlay on Flood Control Projects– (Scheme in Five Year Plan)
–	–	(9) Anti-Sea Erosion
–	–	Total
		3051–Capital outlay on Ports and Light Houses–
2132000	3446100	(10) 190–Assistance to Public Sector and other undertakings. Grant-in-Aid to M. M. B. (Minor Port Development) (Scheme Expenditure)
2132000	3446100	Total

(क) एकूण अर्थसंकल्पाचा प्रधानशीर्ष कार्यक्रमनिहाय तपशील

विवरणपत्र 'ब'

कार्यक्रम क्रमांक Programme No.	तपशील	प्रत्यक्ष रकमा २०२०-२०२१ Actual 2020-2021	अर्थसंकल्पीय २०२१-२०२२ Budget Estimates 2021-2022
1	2	3	4
११३०५६--अंतर्गत जलवाहतुकीवरील भांडवली खर्च			
	१९०-सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना साहाय्यक अनुदान म. मे. बो. साहाय्य अनुदान (जलआलेखन सर्वेक्षण व संशोधन) (कार्यक्रमांवरील खर्च) (३०५६००५५)	1400	39700
	एकूण ...	1400	39700
	एकूण ...	1400	39700

टीप.--महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या स्थापनेमुळे योजनेतर व योजनांतर्गत शीर्षाखाली मुख्य लेखाशीर्ष ३०५१--बंदरे व दीपगृहे व ३०५६--अंतर्गत जलवाहतूक या अंतर्गत १९०--सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रम यांना साहाय्य, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास साहाय्यक अनुदान या शीर्षाक्षाली तरतूद मंजूर करण्यात येत आहे.

